# <u>वार्तापत्र</u>

कार्यालय पोलीस अधिक्षक ,
गडचिरोली दिनांक ०३/०१/२०१९

महाराष्ट्र पोलीस स्थापना दिनानिमीत्त दिनांक ०२ जानेवारी ते ०८ जानेवारी या कालावधीत गडचिरोली जिल्हा पोलीस दलातर्फे ‘रेझींग डे’ च्या माध्यमातुन विविध जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. आज दिनांक ३ जानेवारी २०१९ रोजी नागरीकांची ‘सायबर गुन्ह्यांविषयी’ लोकजागृती व्हावी या दृष्टीकोनातुन सकाळी ११:०० वा. ‘सायबर दिंडी’ चे आयोजन करण्यात आले. यामध्ये गडचिरोली शहरातील विविध शाळा, महाविद्यालयांतील विद्यार्थी - विद्यार्थींनीनी सहभाग नोंदविला होता. यावेळी मा. पोलीस अधिक्षक श्री शैलेश बलकवडे साो., मा. अपर पोलीस अधिक्षक श्री महेंद्र पंडित साो., मा. अपर पोलीस अधिक्षक श्री मोहीत गर्ग साो., मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री विशाल ढुमे साो. यांच्या प्रमुख उपस्थितीत गडचिरोली शहरात इंदिरा गांधी चौक ते मुल रोड अशी पायी ‘सायबर दिंडी’ काढण्यात आली. यावेळी नागरिकांना सायबर गुन्हयांविषयी माहीती व्हावी यासाठी मोठ्या प्रमाणावर माहीतीचे फलक लावण्यात आले होते. यावेळी उपस्थित नागरिकांना पथनाट्याव्दारे सायबर गुन्हेगारी, एटीएम फ्रॉड, व्हाटसअॅप च्या माध्यमातुन पसरविल्या जाणाऱ्या अफवा, ऑनलाईन खरेदी विक्री व्यवहार यादरम्यान होणारी फसवणुक इत्यादी बाबत जागृती करण्यात आली.

गडचिरोली पोलीस विभागामार्फत गडचिरोली जिल्हयातील आदिवासी गरजु नागरीकांना त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवुन देण्याच्या उद्देशाने प्रगती ( **PRGATI**) **Police Resolution to Accelerate Growth Through Identity Cerfication** हा उपक्रम राबविण्यात येत आहे. सदर उपक्रमा अंतर्गत पोलीस मदत केंद्र रेगडी हद्दीतील विकासपल्ली व रेगडी या गावातील १५ नागरीकांचे पोलीस विभागामार्फत फार्म भरुन उप प्रादेशिक परिवहन कार्यालय येथुन चार चाकी व दु चाकी वाहनांचा शिकावु परवाना काढुन देवुन सदर कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली.


गडचिरोली सायबर पोलीस
ए.टी.एम कार्ड व ए.टी.एम मशीन वापराबाबत घ्यावयाची काळजी


पाव भाजी सेंटर